# Research Paper Published In Journal Academic Year 2018-19


2018-19

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL



# AJANTA

Volume - VII, Issue - IV
October - December - 2018
Marathi

Impact Factor / Indexing
2018 - 5.5
www.sjifactor.com

AJANTA PRAKASHAN

डॉ. दत्ता मा. तंगलवाड
सहायक प्राध्यापक आणि समाजशास्त्र विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर (गढी)

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

# २८. बालविवाहाचे किशोरवयीन मुलीच्या शारिरीक व मानसिक आरोग्यावर झालेले परिणाम - एक समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. दत्ता मा. तंगलवाड**
सहाय्यक प्राध्यापक आणि समाजशास्त्र विभागप्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर (गढी) ता. गेवराई जि. बीड.

**प्रस्तावना**

किशोरावस्था ही मानवी जीवनातील महत्वपूर्ण अवस्था असून ही वादळी अवस्था म्हणून या अवस्थेकडे पाहिले जाते. उघडया डोळयाने स्वप्न पाहून ती पुर्णत्वाला नेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करण्याचे वय म्हणजे किशोरावस्था होय. शरीरात असलेल्या भरपुर उर्जेला योग्य दिशेला वाटचाल करायला लावणे गरजेचे असते. अन्यथा विनाशाकडील वाटचालीचे पाऊल याच वयात उचलले जाण्याची शक्यत असते.कारण जीवनातील सर्वाधिक विचलीत अवस्था म्हणुन या अवस्थेला ओळखले जाते.या अवस्थेतील मुले-मुली क्षणात खुपच खुश दिसतात तर क्षणात खूपच निराश असल्याचे नजरेत येतात.तणाव व दबावाखाली जीवन जगणारी भावनात्मक अस्थिरतेची अवस्था म्हणून या अवस्थेकडे पाहिले जाते.या अवस्थेचा कालावधी हा वयाची १३ ते १९ वर्षापर्यंत मानला जातो.जी.स्टानलेहॉल यांनी या अवस्थेतीला जीवनातील संकटकालीन अवस्था असे म्हटले आहे.तर काही विचारवंत जिवनातील सोनेरी कालखंड मानतात,कारण रंगीबेरंगी स्वप्न पाहण्याचे या आवस्थेतील हेच वय असते.मुला-मुलींना शारिरीक व मानसिक विकास पुर्णत्वाकडे वाटचाल करताना दिसतो. या अवस्थेत मुले-मुलीसुंदर व आकर्षक दिसायला लागतात आणि कामेमच्छुक भावना वृद्धींगत होवून विरुद्ध लिंग आकर्षण व प्रेमसंबंधाची निर्मिती होण्याचे प्रमाण वाढते म्हणुन या अवस्थेला मानवी जीवनातील वादळी अवस्था असे म्हणतात. म्हणून या अवस्थेत मुलींचा विवाह झाल्यास त्यांचे शारिरीक व मानसिक आरोग्यावर होणाऱ्या विविध परिणामांचा आढावा प्रस्तुत लघुशोधनिबंधात घेण्यात आला आहे.

**संशोधनविधान -** ख्बालविवाहाचे किशोरावस्थेतील मुलींच्या शारिरीक व मानसिक आरोग्यावर झालेला परिणाम एक अध्यास.

**संशोधनाची उद्दिष्टये**

१. किशोरावस्थेतील मुलीच्या शारीरिक व मानसिकस्थितीचा आढावा घेणे.
२. किशोरावस्थेतील मुलीच्या शारिरीक व मानसिक क्षमताचा आढावा घेणे.
३. किशोरावस्थेतील विवाहामुळे मुलीच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर झालेला परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके**

१. किशोरावस्थेतील मुली शारिरीक व मानसिक दृष्टया परिपक्व नसतात.

दत्ता मा. तंगलवाड
विभाग प्रमुख

२. किशोरावस्थेतील विवाहामुळे मुलींना अनेक रोगांचा सामना करावा लागतो.

**नमुना निवड**

प्रस्तुत संशोधनासाठी १३ ते १९ वयोगटातील विवाहीत ५० मुलींची निवड करुन प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या माहिती संबंधीत करण्यात आली.

**तथ्य संकलनाचीसाधने**

माहितीसंकलनासाठी मुलाखत, निरीक्षण तंत्राचा अवलंब करण्यात आला.तसेच विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्र, इंटरनेटचा वापर करण्यात आला.

**संशोधनाचे कार्यक्षेत्र**

प्रस्तुतसंशोधकासाठी गेवराई तालुक्यातील निवडक गावातील किशोर अवस्थेतील विवाहीत मुलींचा अभ्यास करण्यात आला म्हणुन **गेवराई तालुक्यातील किशोर अवस्थेतील विवाहीत मुली हेसंशोधनाचे कार्यक्षेत्र आहे.**

**माहितीचे विश्लेषण**

प्रस्तुत लघु शोधनिबंधामध्ये पौगंडावस्थेतील म्हणजेच किशोरावस्थेतील मुलीच्या शारिरीक व मानसिकस्थितीचा आढावा घेवून शारीरिक परिपक्वता येण्यापुर्वी जर मुलीचे विवाह झाले तर अशा मुलींना कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**किशोरावस्थेची संकल्पना**

"इंग्रजीतील Adolescence या शब्दाचा मराठी अनुवाद किशोरावस्था असा होतो. किशोर अवस्था ही मन व शरिराने परिपक्वतेकडे वाटचाल करणारी अवस्था असल्यामुळे Adolescence म्हणजे To grow to maturity असे म्हटले जाते"[१] या अवस्थेतील मुलीचा शारिरीक व मानसीक, मनोवैज्ञानिक क्षमतांचा विकास झालेला असतो. दिवास्वप्न पहाण्याकडे कल वाढण्याची ही अवस्था आहे म्हणुन तीला जीवनातील वादळी अवस्था असे म्हणतात. या अवस्थेबद्दल वेगवेगळया विचारवंतांनी वेगवेगळी मते मांडलेली आहेत ती पुढीलप्रमाणे सांगता येतील-

१) जार्सील्डच्या मते - एका विकसनशील व्यक्तीची बाल्यावस्थेकडुन परिपक्वावस्थेकडे केलेली वाटचाल म्हणजे किशोरावस्था होय.[२]

२) कारमाइकेलच्या मते - किशोरावस्था ही मानवी जीवनाची अशी अवस्था आहे की ज्या अवस्थेत व्यक्ती शारिरीक व मानसिक विकासाच्या एका विशिष्ट सिमेकडे वाटचाल करतो.शरीर परिपक्व बनुन संतान प्राप्तीस सक्षम बनतो.[३]

३) डार्थी रेजर्सच्या मते - किशोरावस्था हा अशा प्रक्रियेचा कालावधी आहे की, ज्यात एक विशेष दृष्टीकोण प्राप्त करुन व्यक्ती परिणामकारकरित्या समाजात सहभागी होण्यास सक्षम बनतो.[४]

**किशोरावस्थेचे प्रकार**

१) **पुर्व किशोरावस्था -** " वयाच्या १३ ते १६ वर्षे या कालावधी हा पुर्व किशोरावस्था म्हणुन ग्राहय धरला जातो. यामध्ये मुली लैंगिक परिपक्वतेकडे वाटचाल करतात. आपले उत्तरदायीत्व समजण्यास सुरुवात होते परंतु या अवस्थेत स्वत:वर नियंत्रण नसते"[५]

२) **उत्तर किशोरावस्था -** "वयाच्या १७-२१ वर्षाचा कालावधी उत्तर किशोरअवस्थेचा समजला जातो. मुलीमध्येही अवस्था १६ ते १९ वर्षाची ग्राहय धरली जाते.या अवस्थेत पुर्णपणे शारीरिक क्षमतांचा विकास होतो.जीवनशैलीमध्ये पुर्णपणे बदल होतो. सामाजिक मुल्ये, रितीरिवाज, प्रथापरंपरांची पुर्ण जाणीव होते. "[६]

अशा प्रकारे शारीरिक व मानसिक दृष्टीने परीपक्व झालेल्या मुला-मुलीचे विवाह करणे समाज व संबंधित मुला-मुलीच्या शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे पण ही परिपक्वता येण्याच्या पुर्वी झालेले विवाह हे बालविवाह समजले जातात. अशा प्रकारचे विवाह मुलींच्या शारिरीक व मानसिक आरोग्यासाठी हाणीकारकठरतात.तसे पाहता बालविवाहाची प्रथा भारतात हजारो वर्षापासुन चालु आहे.काळाच्या ओघात त्या त्या पिढयांना बालविवाहाच्या परिणामाला सामोरे जावे लागते.१९ व्या शतकातील प्रबोधनाचा वाढता परिणाम समाजसुधारकांनी केलेले प्रयत्न यामूळे बालविवाहाचे कमी करण्याचा प्रयत्न केला.शासनाने वेळोवेळी कायदे करुन बालविवाह प्रतिबंध करण्यासाठी प्रयत्न केला. "१९२९ चा बालविवाह प्रतिबंध कायदाहिंदु विवाह वैधता १९२९, १९५५ चा हिंदु विवाह कायदा, १९५४ चा विशेष विवाह कायदा याद्वारे शासनाने वेळोवेळी बालविवाहावर प्रतिबंध घालण्याचे प्रयत्न केले.विवाहाचे वय वेळोवेळी निर्धारीत करण्यात आले होते.१९२९ च्या कायद्याप्रमाणे मुलाचे विवाहाचे वय १८ वर्षे व मुलीचे विवाहायचे वय १४ वर्षे होते.१९७८ मध्ये त्यात सुधारणा होऊन मुलाचे वय २१ व मुलीचे वय १८ वर्षे केले.या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस तुरुंगवास व १००० रुपयाचा आर्थिक दंड आकारण्यात आला होता. "[७] पण फाटा देवुन सर्रास बालविवाह केला जातात.त्यामुळे अजुनही बालविवाहाचे भारतातून निर्मलून झाले नाही वयात येण्यापूर्वी लग्न झाल्यामुळे किशोरवयात संसारीक जबाबदाऱ्यांना सामोरे जावे लागते.लैंगिक वासनेस बळी पडावे लागते आणि जर तो विवाह जरठ विवाह असेलतर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अनेक मुली स्वत:च्या जीवनाचा अंत करतात. परीपक्व होण्यापुर्वी मातृत्व प्राप्त झाल्यामुळे परीपक्व बालकांचा जन्म होत नाही.कारण गर्भाशयाचे वाढ झालेली नसते अनेक मुलींना बाळंतपणातच प्राण गमवावे लागते.अशा प्रकारे किशोरावस्थेतील मुलीच्या विवाहाच्या विविध परिणाम आपणांस पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) अल्पवयातील मातृत्वामुळे शरीरावर विपरीत परिणाम**

किशारवयात मुलीचे विवाह झाल्यास शरीर परिपक्व होण्यापुर्वी मातृत्व प्राप्त झाल्यामुळे अनेक शारिरीक रोगांना बळी पडावे लागते.गुप्त रोगाचा देखील सामण करावा लागतो

डॉ. दत्ता मो. तंगलवा
सहयोगक प्राध्यापक आणि समाजशास्त्र विभाग प्र

**२) जरठ-कुमारी विवाह मुळे विधवांच्या प्रमाणात वाढ**

विजोड विवाहामुळे वयस्क व्यक्तीचा विवाह अल्पवयीन मुलीशी होतो.हा वयस्क पती मरण पावल्यास मुलीला विधवाचे जीवन जगावे लागते.अशा विधवांना कुंटूंबातच लैंगीक अत्याचाराला तोंड द्यावे लागते.त्यातून गर्भधारणा झाल्यास त्या विधवेला आत्महत्येशिवाय पर्याय राहत नाही.किंवा घरातून पलायन करुन अशा स्त्रीया वेश्याव्यवसायाकडे वळलेल्या दिसुन येतात.म्हणजे शारिरीक व मानसिक परिपक्वता येण्याच्या पुर्वीच संघर्षांना तोंड द्यावे लागते परिणामी अशा मुलीचे शारिरीक मानसिक खच्चीकरण होताना दिसून येते.

**३) बाळ व मातामृत्यु संभवतो**

शारीरिक परिपक्वता येण्यापुर्वीच झालेल्या विवाहामुळे वैवाहिक संबंधातुन जन्माला येणारे बाळ परिपक्व तयार होत नाही व शारिरीक क्षमातचा विकास पुर्ण न झाल्यामुळे बाळंतपणात होणाऱ्या वेदना, होणारे सिझर यामुळे बऱ्याचवेळी माता किंवा बाळ दगावण्याची इतके उदाहरणे आपणास पहावयास दिसतात. म्हणून बाळंतपण हा स्त्रीचा पुनर्जन्म मानला जातो.

**४) मानसिक ताण-तणावात वाढ**

बालवयातील समज अल्पप्रमाणात असते.परिणामी संसारीक जीवनात अनेक चुका होतात त्यामुळे अशा मुलींना सासु-सासरे, नणंद यांच्या त्रासाला सामारे जावे लागते. प्रसंगी मारहाण, जाच जुलूमाला तोंड द्यावे लागते.त्यामुळे अनेक मुली डिप्रेशन मध्ये जावुन वैवाहिक संबंध मोडण्याचा विचार करतात किंवा आत्महत्या करतात.

**५) वैवाहीक जीवणतील समायोजनावर परिणाम**

शारीरिक संबधातील पतीच्या मनमानीमुळे देखल किशोरवयीन मुलीना गुप्तरोगाचा सामना कसावा लागतो पुन्हा पुन्हा होणारे बळांतपन त्यासाठी होनाऱ्या यातना ,जाच जुलूमा त्यामुळे अनेक मुली डिप्रेशन मध्ये जावुन वैवाहिक संबंध मोडण्याचा विचार करतात किंवा आत्महत्या करतात.

**निष्कर्ष**

१) बालविवाह प्रतिबंधक अनेक वेळा कायदे करुन देखील सामाजिक जनजागृती अभावी आजही ग्रामीण भागात विवाह होताना दिसुन येतात.

२) पौगंडावस्थेतील विवाहामुळे अल्पवयात मुलींना लैंगिक शोषणाला बळी पडावे लागते.त्यातून अनेक गुप्तरोगांचा सामना करावा लागतो.

३) अशा मुली मानसीकदृष्टया परिपक्व नसल्यामुळे संसारिक जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.सुन-सासु संबंध, पती-पत्नी संबंध, नंतर दिर यांच्याशी कसे वागावे हे देखील बऱ्याच मुलींना समज नसते.परिणामी कौटुंबिक कलहांना तोंड द्यावे लागते.

४) विजोड विवाह झाल्यास वैधव्य नशीबाला येवुन आयुष्यभर वासनेचा बळी ठरावे लागते.अशा मुलीची अब्रु घरातीलच सासरे, दिर, भाया यांच्याकडुन लुटली जाते.



डॉ. दत्ता मा. तंगलवाड
सहाय्यक प्राध्यापक आणि समाजशास्त्र विभाग प्रमुख
... शिवाजीनगर (बीड)

५) परिपक्वता येण्यापुर्वी होणाऱ्या विवाहापुळे कौटुंबिक संघर्षातून अनेक मुलींना आत्महत्या केलेल्या दिसून येतात

६) शारीरिक व मानसिक विकास खुटतो व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास होत नाही

संदर्भ ग्रंथ

१) राम अहुजा, मुकेश अहुजा (२००८), समाजशास्त्र, रावत पब्लीकेशन्स, नई दिल्ली.

२) डॉ. वृन्दा सिंह (२०१०) किशारावस्था - समस्या और समाधान, पंचशील पब्लिकेशन्स, जयपुर.

३) एस.एस.गाठाळ (२०१२) भारतीय स्त्रियांचा इतिहास व स्त्री जीवन, कैलाश पब्लीकेशन्स औरंगाबाद.

४) हरिकृष्ण रावत (२००६) उच्चस्तर समाजशास्त्र विश्वकोश, रावत पब्लिकेशन्स, जयपुर.

५) नि.रा.देसाई (१९८७) भारतीय समाजातीलस्त्रियांचे स्थान, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

६) राम अहुजा, मुकेश अहुजा (२००८), समाजशास्त्र, रावत पब्लीकेशन्स, नई दिल्ली.



डॉ. दत्ता मा. तंगल
सहाय्यक प्राध्यापक आणि समाजशास्त्र विभा
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर